वाचा :- १. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. २५, दि. २८.१०.१९८८
२. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. १६, दि. ३१.१०.१९९७
३. संचालनालयाचे कार्यालयीन आदेश क्र. ०१/२०१७, दि. १८.०१.२०१७

---

स्था.१८/ब/ अहवाल शाखा /वलेप अहवाल/न.क्र.१८३/

**संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**महाराष्ट्र राज्य,**
**कोंकण भवन, ६ वा मजला,**
**नवी मुंबई -४०० ६१४**

## स्थायी आदेश क्र.१२/२०१७, दिनांक 14 JUN 2017

विषय:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण अहवालातील भाग- १ मध्ये विशेष लेखापरीक्षण अहवालांतील परिच्छेदांचा समावेश करणेबाबत.

प्रस्तावना:-

उपरोक्त वाचामधील आदेश क्र. ०१ ते ०२ अन्वये संचालनालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेखापरीक्षण अहवालांची बांधणी व मांडणी संदर्भात आदेश निर्गमित केले आहेत. लेखापरीक्षण अहवालातील भाग -१ मध्ये मागील लेखापरीक्षणाबाबत संक्षिप्त स्वरुपात यथोचित माहिती उपलब्ध होत नसल्याने संदर्भ क्र. ०३ अन्वये सर्व ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल तयार करताना भाग-१ (मागील लेखापरीक्षण) बाबत सुधारीत नमुना निर्गमित केला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियमित लेखापरीक्षण अहवालांचे अवलोकन केले असता, भाग -१ मध्ये विशेष लेखापरीक्षण अहवालांतील परिच्छेदांचा समावेश नसल्याचे दिसुन आले. नियमित लेखापरीक्षण अहवालांतील भाग-१ मध्ये विशेष लेखापरीक्षण अहवालांतील परिच्छेदांचा समावेश असणे आवश्यक आहे. यास्तव खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

आदेश:-

१. सर्व ग्रामीण व नागरी स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल तयार करताना भाग -१ (मागील लेखापरीक्षण) मध्ये विशेष लेखापरीक्षण अहवालातील परीच्छेदांचा समावेश करण्यात यावा.
२. विशेष लेखापरीक्षण अहवाल ज्या वर्षी निर्गमित करण्यात आला आहे, त्यावर्षीच्या नियमित लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदांच्या समावेशानंतर विशेष लेखापरीक्षण अहवालातील परीच्छेदांचा समावेश भाग -१ (मागील लेखापरीक्षण) मध्ये करण्यात यावा.

उदा. नगरपालिका ------- चे सन २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीचा विशेष लेखापरीक्षण अहवाल

सन २०१६-१७ मध्ये निर्गमित केला असल्यास, सदर विशेष लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदांचा समावेश संबंधित नगरपालिकेच्या सन २०१६-१७ च्या नियमित लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदांच्या समावेशानंतर करण्यात यावा.

| भाग पहिला (मागील लेखापरीक्षण)<br>--------------- विभाग, जिल्हा परिषद --------------- सन २०१५-१६ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ले.प.वर्ष | प्रलंबित परिच्छेद क्रमांक | | एकुण परिच्छेद | पं.रा.स / नागरी स्व.सं.च्या ले.प. पुनर्विलोकन अहवालातील परि क्र. --------- / सांकेतांक क्र.---- | पं.रा.स / नागरी स्व.सं.च्या ले.प. पुनर्विलोकन अहवालात अंतर्भूत परिच्छेदाचा संक्षिप्त तपशिल |
| | स्वनिधी | शासन निधी (केंद्र /राज्य) | | | |
| १९६२-६३ | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| २०१५-१६ | | | | | |
| २०१६-१७ | ४,८ | ३,५ | ४ | --- | --- |
| **विशेष लेखापरीक्षण अहवाल सन २०११-१२ ते २०१४-१५** | १,२,३,५,९,१३ | ४,६,७,८,१०, ११,१२,१४,१५ | १५ | --- | --- |
| २०१७-१८ | | | | | |

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

**प्रत:-** सर्व सह संचालक व जिल्हा सहाय्यक संचालक,स्थानिक निधी लेखापरीक्षा, यांना कळविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रमाणे सर्व लेखापरीक्षकांना योग्य त्या सुचना दयाव्यात.